शासकीय जिल्हा ग्रंथालयांची उपकेंद्रे/डिजिटल उपकेंद्रे स्थापन करण्यास प्रशासकीय मान्यता देणे. निकष व कार्यपद्धती ठरविणेबाबत.......

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक मराग्रं-२०११/(२५/११)/साशि-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०१२.

पहा : १) नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्र. जिवायो-१०१०/प्र.क्र.२१०/का.१४८१, दि.२५.८.२०१०
२) ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र. ३४/जि.ग्रं.उपकेंद्र/२०१०-११/६१४७, दि. २१.०७.२०१०
३) ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र. ३४/उपकेंद्रे प्र.मा./२०११-१२/१६१६७, दि. २४.१.२०१२

**प्रस्तावना :** ग्रंथालयांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने, काळाची गरज ओळखून संगणकावर आधारित ग्रंथालयीन सेवा देणे क्रमप्राप्त होत आहे. याचाच एक भाग म्हणून राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचे उपकेंद्र, अंधेरी-चकाला व ठाणे वर्तकनगर येथे सुरु करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार सातारा, नांदेड, जालना व रायगड येथे उपकेंद्र स्थापन करण्याची घोषणा तत्कालिन मा. वित्त मंत्री यांनी त्यांचे सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पिय भाषणात केली. तथापि, समृध्द स्पर्धा परीक्षा विभाग, डिजिटल संग्रह विभाग व इंटरनेट माहिती सेवा विभाग विकसित करुन वाचकांना सेवा देण्यासाठी, सर्व शासकीय जिल्हा ग्रंथालयांची उपकेंद्रे/डिजिटल उपकेंद्रे स्थापन करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यास अनुसरुन सर्व शासकीय जिल्हा ग्रंथालयांची उपकेंद्रे/डिजिटल उपकेंद्रे स्थापन करण्यासाठी सर्वसाधारण प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे सर्वसाधारण निकष व कार्यपद्धती ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे-

**शासन निर्णय :**

नियोजन विभागाचे संदर्भांकित क्र.१ येथील परिपत्रकानुसार, सर्व शासकीय जिल्हा ग्रंथालयांचे एक उपकेंद्र/डिजिटल उपकेंद्रे स्थापन करण्यास, प्रशासकीय मान्यता देणे तसेच त्याकरीता आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबतची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती, यांनी करावी.

शासकीय जिल्हा ग्रंथालयांची उपकेंद्रे/डिजिटल उपकेंद्रे स्थापन करण्यासाठीचे निकष व त्यांची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे असेल -

अ) डिजिटल उपकेंद्र हे जिल्हा ग्रंथालयाचाच भाग राहील व ते एक विभाग म्हणून जिल्हा ग्रंथालयामध्ये वा जिल्ह्यातील अन्य कोणत्याही तालुक्याच्या ठिकाणी भाड्याच्या वा स्वत:च्या जागेमध्ये व्यवस्थापित करता येऊ शकेल.

ब) जिल्हा ग्रंथालयाच्या डिजिटल उपकेंद्रासाठी स्वतंत्र भूखंड उपलब्ध झाल्यास तेथे इमारतीचे बांधकाम करण्यासाठी, संबंधित जिल्हा नियोजन समिती किंवा राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता, यांच्याकडून अथवा आवश्यकतेनुसार दोन्ही ठिकाणाहून निधी उपलब्ध करुन घ्यावा.

क) या डिजिटल उपकेंद्रांमध्ये, डिजिटल व मुद्रित अशा दोन्ही स्वरुपाचे साहित्य संदर्भासाठी उपलब्ध होतील. शासकीय ग्रंथालयांमध्ये उपलब्ध असलेली दुर्मिळ हस्तलिखिते/ग्रंथ आणि ग्रंथेतर वाचन साहित्याचे, डिजिटायझेशन करुन, ग्रंथालय संचालनालयाच्या संकेतस्थळावर सर्वसामान्य वाचक, विशेष अभ्यासक, विद्यार्थी व संशोधकांसाठी डिजिटल डेटाबेस उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

ड) इंटरनेटवर विविध विषयांवरील उपयुक्त व उपलब्ध ग्रंथ, आर्टिकल्स, न्यूज आयटम्स, सांख्यिकीय माहिती, विविध विभागांचे अहवाल, थिसीस, इ. डाऊनलोड करुन, त्यांचा स्वतंत्र संग्रह करुन, संबंधित सॉफ्टवेअरच्या सहाय्याने मेटा डेटा (इंडेक्सिंग) करुन संदर्भासाठी, सदर संग्रह या उपकेंद्रांमधून उपलब्ध करुन देण्यात यावा.

इ) सीडीज/ डिव्हिडीज/ टॉकिंग बुक्स/ राजकीय, समाजिक क्षेत्रातील प्रथितयश विशेषज्ञांची संभाषणे इ. चा संग्रह विकसित करणे व त्या त्या विषयाच्या वाचकांना उपलब्ध करून देणे,

फ) इतर ग्रंथालये/माहिती पुरविणाऱ्या विविध संस्थांचे सभासदत्व प्राप्त करुन घेऊन माहितीचा डेटाबेस संबंधित डिजिटल उपकेंद्रामध्ये/विभागामध्ये उपलब्ध करुन देणे व ग्रंथालय संचालनालयाच्या संकेतस्थळाद्वारे सदर ऑनलाईन डेटाबेस, संदर्भासाठी उपलब्ध करुन देण्यात यावा.

ग) डिजिटल उपकेंद्र/विभाग व्यवस्थापित करण्यासाठी प्रत्येक जिल्हा ग्रंथालयासाठी नियोजन व वित्त विभागाने भांडवली खर्चासाठी घालून दिलेल्या उपकेंद्रनिहाय अनावर्ती खर्चाची मर्यादा रु.५.०० कोटी व आवर्ती खर्चाच्या रु. ५०.०० लक्ष मर्यादेच्या अधीन राहून त्या विभागाचे वा उपकेंद्राचे व्यवस्थापन करण्यात यावे.

ह) शासकीय जिल्हा ग्रंथालयांचे डिजिटल उपकेंद्र स्थापन करण्यासाठी आवश्यक असणारा भांडवली खर्च संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करुन निधी उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करावी.

ज) डिजिटल उपकेंद्र स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेले ग्रंथालय शास्त्र, संगणक व माहिती तंत्रज्ञान आणि त्यासंबंधीच्या सेवा देता येण्यासाठी आवश्यक असलेला किमान ४ कर्मचारीवृंद (ज्यामध्ये १ तांत्रिक सहाय्यक, १ प्रोग्रामर, १ डेटा एंट्री ऑपरेटर, १ शिपाई) उपलब्ध करुन देण्यात यावे व त्यांच्या वेतन व आस्थापनाविषयक खर्चासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी.

२. सदर योजना जिल्हास्तरीय असल्याने, जिल्हा नियोजन समितीकडे शासनाच्या नियोजन विभागाकडून वेळोवेळी निर्गमित होणा-या मार्गदर्शक सूचनांनुसार योग्य ती कार्यवाही /योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी. ही योजना जिल्हास्तरीय असल्यामुळे

याकरीता निधी उपलब्ध करणे व तो वितरित करणे याबाबतची कार्यवाही जिल्हा नियोजन व विकास समितीमार्फत करण्यात यावी.

३. शासकीय जिल्हा ग्रंथालयांच्या उपकेंद्रांकरीता आवश्यक बाबी व तांत्रिक मान्यता देण्याकरीता संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, हे सक्षम असतील. तसेच या सर्व कार्यालयांचे ते नियंत्रण अधिकारी असतील.

४. सदर योजनेसाठी, संबंधित जिल्हा ग्रंथालयांचे ग्रंथापाल (गट-ब) यांना कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करण्यात येत आहे व त्यांना आहरण व संवितरणाचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

५. उपरोक्त बाबींवर होणारा खर्च हा संबंधित जिल्हाच्या लेखाशीर्षाखालील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या परिपत्रक क्र. जिवायो १००७/प्र.क्र.३९/का-१४४४, दि.१६.२.२००८ मधील परि.३.१ नुसार तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दि. १५/५/२००९ अन्वये सुधारित करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तीका १९७८, भाग पहिला, उपविभाग ३, अनुक्रमांक ४, नियम क्र. २७(२) अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

बा.ओं.हेमाडे

( बा. ओं. हेमाडे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा परीक्षा/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
३) सर्व जिल्हा ग्रंथापाल (गट ब), (संचालनालयामार्फत)
४) सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती (संचालनालयामार्फत)
५) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (संचालनालयामार्फत)
७) कार्यासन साशि-१, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) नियोजन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९) निवडनस्ती.